# नोकरी-व्यवसाय मार्गदर्शन

## दहावी, बारावी, पदवीनंतर पुढे काय? (भाग १)



# कॉलेज कट्टा

मे १९९५
मूल्य १० रु.

भंवरलाल जैन :
स्वत:च्या पायावर
उत्तुंग होण्याची कला.

विविध क्षेत्रातील संधी
आणि कर्जाच्या सोयी

# कॉलेज कट्टा

मे १९९५

मूल्य १० रुपये

नोकरी व्यवसाय मार्गदर्शन विशेषांक : भाग १

## मार्गदर्शन


दहावीनंतर काय? : २०
बारावीनंतर : २७
पदवीनंतरचे अभ्यासक्रम : ३०
आय. टी. आय. : ३२
तंत्रशिक्षण देणाऱ्या संस्था : ३३
आय. आय. टी. : ३४
काही वेगळ्या वाटा : प्रा. विलास पाठक : ३५
व्यवस्थापन प्रवेश परीक्षा : सुजाता खन्ना : ३९
धंद्यासाठी पैसा मिळवण्याचे मार्ग : शेखर निकाळजे : ४०
तरुण स्पर्धा परीक्षांमध्ये मागे का? : प्रा. के. एल. पवार : ५०
औषधांची व्यावसायिक दुनिया : ५२
संगणकातील सुवर्णसंधी : ५७
वैद्यकीय प्रवेश परीक्षा : कर्नल (निवृत्त) म. गो. दिवाण : ६०
कमी मार्कांत इंजिनिअर व्हा : अजित गोसावी : ६२
सर्वाधिक सन्मानाची संधी : श्याम आगरवाल : ६४
रुग्णालय व्यवस्थापन : डॉ. प्रभाकर गुप्ते : ६५


## नेहमीचे पण वेगळे


संवाद : २
शब्दांचे रंग : २
पत्रापत्री : ४
राजकारण : कपिल घोरपडे : ५
मुलाखत :- उद्योगपती भवरलाल जैन : देवेंद्र देशपांडे / शैलश वाडेकर : ६
संगणक युग : कर्नल ए. के. बाली : ५४
संगणक प्रश्नस्पर्धा : ५६
आपणही हे करू शकता : ६६
कॉक अंताक्षरी : ६७
ज्ञानवर्धन स्पर्धा : ७०
ओळख :- दत्ता राऊत : शंतनू हिरळकर : ७१
जाहिरात रंगवा स्पर्धा : ७२
चाणाक्ष उत्तर स्पर्धा : ७२



मुलाखत

# स्वकष्टानेही मोठं होता येतं : भवरलाल जैन

❑ देवेंद्र देशपांडे / शैलेश वाडेकर

**मोठ्ठं होणं सोप्पं नाहीच महाराजा ! मोठं, आणखी मोठं होत जायचं असेल, पैसा, कीर्ती मिळवत नैतिकपणे सर्वोच्च पदावर पोहोचायचं असेल तर लागते मेहनत, अपार कष्ट करायची भरपूर तयारी – पण एवढंच असूनही चालत नाही. त्यासाठी लागते मनाची दुर्दम्य इच्छाशक्ती. श्रेष्ठत्वाचा निखळ ध्यास ! सतत धडपडत राहायचा, न कंटाळण्याचा आत्मविश्वास! तेव्हाच राहते उभी शून्यातून स्वतःला हवी असलेली सृष्टी. अशा स्वसृष्टीचे उद्गाते महाराष्ट्रात अगदी मोजके आहेत. त्यातलंच एक नाव आहे उद्योगपती भवरलाल जैन! त्यांची ही सविस्तर मुलाखत.**


सामान्य परिस्थितीवर मात करून अद्वितीय कामगिरी करणाऱ्या व्यक्ती पुढच्या पिढ्यांची प्रेरणास्थानं असतात. चांगल्या मार्गाने जगण्याचा प्रयत्न केला तर मोठं होणं शक्यच नाही, अशी एक समजूत एकंदरच महाराष्ट्रीय तरुणांमध्ये रूढ झालेली आहे.

अशा परिस्थितीत जैन उद्योगसमूहाने सचोटीने व्यवहार करून जळगाव शहराला केवळ देशातच नाही तर जगात एक ओळख करून दिली. आजही जळगावला जाणाऱ्याला 'काय जैनांकडे काय?' हे विचारलं जातं. अशा भवरलाल जैन यांच्या यशाची कारणं, त्यांची मतं आणि मार्गदर्शन, नोकरी-व्यवसाय निवडताना द्विधा मनःस्थितीत असणाऱ्या युवकांना दिशा निवडीसाठी निश्चितच मार्गदर्शक ठरतील. त्यांच्याशी प्रत्यक्ष जळगावला जाऊन केलेली बातचीत.

***आपल्या यशामागे कौटुंबिक संस्काराचा भाग कितपत आहे?***

माझ्या आईचे - कुटुंबाचे संस्कार माझ्या जीवनात मला उपयोगी ठरलेलेच आहेत. वाकोद सारख्या देशातील अत्यंत छोट्या गावात जन्म झालेल्या माझ्यासारख्याने खूप मोठं व्हावं अशी आई-वडिलांची केवळ इच्छाच नव्हती तर त्यांनी वेळोवेळी मला त्यासाठी उत्तेजनही दिलं. हाच अनुभव माझ्या काकांचाही होता. १९६०च्या सुमारास मुंबईरूपी विस्तीर्ण सागरात मी प्रवेश केला. सिडनहॅम कॉलेजला प्रवेशद्वारावरच पंचावन्न टक्क्यांपेक्षा कमी मार्क असणारांनी प्रवेशासाठी अर्जच करू नये, अशी सूचना लिहिली होती. पण मला प्रवेश मिळू शकला, कारण मला त्यापेक्षा जास्त मार्क्स होते. ही आठवण सांगायचं कारण इतकंच की त्यावेळीही काही महाविद्यालयांमध्ये प्रवेश सोपा नव्हता. याच काळात माझ्यावर संस्कार करणाऱ्या व आयुष्यभर स्मरणात राहणाऱ्या काही गोष्टी घडल्या. एक घटना सांगतो. घटना तशी लहानच, पण खूपच परिणामकारक आहे.

काकांची परिस्थिती तशी जेमतेमच होती. मला कॉलेजला जाताना कपडे हवे म्हणून एका दुकानात कपडे खरेदीसाठी मी गेलो. एकंदर सर्व परिस्थितीचा विचार करून मी खाकी रंगाचं साधारण कापड निवडलं. काका प्रिमियर ऑटो-मोबाईलमध्ये कामाला असल्याने त्यांच्यासारखेच कपडे मी निवडले. ते कपडे पाहताच काका म्हणाले, 'नाही, नाही हे कापड तू घेऊ नकोस. उच्च दर्जाचं नायलॉनचं कापड घे. कारण आपल्या वर्तमान परिस्थितीपेक्षा उच्च अभिरुची व दर्जा



श्रेष्ठत्वाच्या सार्थकतेचा शोध : भवरलाल जैन



**कुठलंही शहर, गाव त्या गावातील माणसं, संस्कृती, विकास व वैशिष्ट्यांमुळे प्रसिद्ध असते. जैन पाईपमुळे जगाच्या औद्योगिक नकाशावर जळगावचं नाव आलं, पण लेखक, कवी, गायक, शास्त्रज्ञ किंवा उत्तम खेळाडू या सर्वांना मी जाहीर आवाहन करतो की तुम्ही जळगावला या, तुम्हाला लागणाऱ्या सर्व सुविधा आम्ही देऊ ! यात आमचा स्वार्थ आहे की तुमच्यामुळे जळगावचं नाव सर्व क्षेत्रांत आघाडीवर येईल आणि विविध क्षेत्रांत तुमच्यासारख्या थोर माणसांमुळे जळगावलाही सन्मान मिळेल.**



**तरुणांनो उद्योगधंद्यात या असं आवाहन केलं जातं तेव्हा नोकर कसे मिळणार? असा प्रश्न मला एकजणाने विचारला. तेव्हा मी म्हणालो, 'काम काहीही करा, अगदी झाडू मारणं असलं तरी तो इतका चांगला मारा की त्या स्वच्छतेबद्दल देवानेही गौरवोद्गार काढले पाहिजेत. सर्वचजण व्यवसाय, धंदा करू शकत नाहीत, पण जे काम करू त्याची शक्य तेवढी माहिती, भवितव्य जरूर पाहावं व प्रत्येक कृतीआधी विचार करूनच कृती करावी म्हणजे चांगले जगता येतं.**

आपण निवडला पाहिजे. ही गोष्ट माझ्या मनावर परिणाम करून गेली. तो शर्ट घालून काढलेला फोटो मी आजतागायत जपून ठेवलेला आहे. याच घटनेमुळे आयुष्यात सतत उच्च गोष्टींचा ध्यास करावा हे माझ्या मनावर कायमचं ठसलं व काकांची प्रतिमाही मनात कोरली गेली.

***तुमच्या यशात शिक्षणाचं स्थान काय?***

शिक्षणाने मला प्रगल्भता दिली. सुरुवातीला मलाही सनदी नोकऱ्यांचं आकर्षण असल्यामुळे मी अगदी एम.पी.एस.सी. परीक्षेला बसून उपजिल्हाधिकारी म्हणून रुजूही झालो होतो. तेव्हा पंचवीस वयोमर्यादा असणाऱ्यांसाठी असलेली एकमेव संधी मी मिळवली होती. जीवनात पुढे काय करायचं हे मी ठरवलं नव्हतं; पण व्यापाऱ्याच्या पोटी जन्म झालेला असल्याने भोवतालच्या वडिलधाऱ्या मंडळींनी हे आपलं काम नाही, हे त्यावेळी पटवून सांगितलं. हे सांगण्यामध्ये त्या काळातील मोठे व्यापारी भिकमचंद जैन हे प्रमुख होते. त्यांनी तर मला व्यवसायासाठी मदतही देऊ केली. भिकमचंद जैन म्हणजे जळगावचे आमदार सुरेशदादा जैन यांचे वडील. सांगायचं तात्पर्य इतकंच की, भरपूर पगाराची नोकरी मिळूनही परंपरागत व्यावसायिक वृत्तीमुळे मला व्यवसायाकडे वळता आलं. अर्थात् माझी शिकण्याची वृत्ती मात्र आजतागायत सदैव राहिली.

***तुमचा व्यावसायिक प्रारंभ, अडीअडचणी याबद्दल काही आठवणी...***

व्यवसाय सुरू करण्यापूर्वी एका गावी सहज उत्सुकतेपोटी ज्योतिषाला हात दाखविला. खरं तर भविष्यावर माझा विश्वास नव्हता. त्या वृद्ध गृहस्थांनी माझा हात पाहून सांगितलं की, 'माती, लोखंड, पेट्रोल यांच्याशी संबंधित व्यवसायाचा तू मोठा व्यापारी होशील.' मी त्यांना सांगितलं, 'जगातील सर्वच गोष्टी याच्याशी संबधित आहेत म्हणूनच कुठलाही व्यवसाय निवडला तरी तो या तिन्हींशी संबंधितच राहणार. हे तुम्ही सांगायची काहीच गरज नाही.' या घटनेचा राग येऊन त्या ज्योतिषांनी माझ्याकडून फी घेतली नाही व हे भविष्य नंतर खरंही ठरलं.

***म्हणजे तरुणांनीही ज्योतिषांकडूनच हात दाखवून व्यवसाय निवडावा का?***

नाही-नाही. ज्योतिष हे एक शास्त्र आहे. काही अंशी ते बरोबरही असेल, पण त्याआधारे व्यवसाय किंवा नोकरी निवडू नये. स्वतःचा आत्मविश्वास कायम ठेवून सहज ज्योतिषाकडे गेलात तर वाईट काहीच नाही; पण निर्णय मात्र सभोवतालच्या परिस्थितीचं व उपलब्धतेचं नीट अवलोकन करून घ्यावा. तर अशा प्रकारे घटना घडताना भिकमचंद जैन यांच्या सल्ल्यानुसार व्यवसाय निवडायचा झाल्यावर रॉकेलचा व्यवसाय करावा असं प्राथमिकरीत्या ठरलं व मग त्याची एजन्सी घेण्याचे बाकी सोपस्कार सुरू केले; पण मुख्य अडचण होती ती भांडवलाची. त्यावेळी आमच्या एकत्र कुटुंबाची शिल्लक होती केवळ सात हजार रुपये. मी माझ्या काकांच्याकडे एजन्सीसाठी त्या पैशाची मागणी केली; पण सगळीच शिल्लक माझ्या हाती दिली आणि पुढं कोणी आजारी पडलं किंवा अडचणी आल्या, लग्नकार्य ठरलं तर काय करणार? इतकी शिल्लक तर हवीच. या उद्देशाने मला कुणी ही रक्कम द्यायला तयार होईना. पण अशा वेळी माझ्या आईने अत्यंत खंबीरपणे कुटुंबात माझी बाजू मांडली व 'मला एकत्र कुटुंबाच्या मालमत्तेतील काहीच हिस्सा देऊ नका, हे सात हजार रुपये मला हिस्सा म्हणून द्या. मला माझ्या मुलाला काहीही करून व्यवसायासाठी ही रक्कम द्यायलाच हवी', असं तिने सांगितलं. शेवटी हो-ना करता तीन पिढ्यांचा ठेवा असलेली सात हजार रुपये रक्कम केवळ माझ्या आईच्या खंबीरपणाने मला मिळाली आणि त्यातूनच मी व्यवसायाचा श्रीगणेशा केला.

***त्या काळातील व्यवसाय सुरू करतानाची परिस्थिती व आज व्यवसाय सुरू करणारांसाठीची परिस्थिती यात काही फरक झाला आहे का?***

कुठल्याही व्यवसायाला अथक परिश्रम लागतात. दृष्टी लागते. ती पूर्वीही लागत होती - आताही लागते. पूर्वी व्यवसायाला वित्तसंस्था किंवा सरकारी योजनांची मदत मिळवणं ही अवघड गोष्ट होती. आता आजुबाजूला व्यवसाय-नोकरीसाठी प्रचंड क्षेत्रं उपलब्ध आहेत. त्यासाठी न कंटाळता स्वतः योग्य क्षेत्र निवडावं.

***तुमच्या आजुबाजूची पार्श्वभूमी व्यापारी होती. त्यामुळे तुमच्या व्यवसायाला किंवा व्यावसायिकपणाला व्यवहाराची जोड होती असं म्हणता येईल. ज्याला अशी पार्श्वभूमी नाही अशा स्थानिक मराठी युवकाने व्यवसायाच्या यशासाठी***

***काय करावं?***


मी काय स्थानिक मराठी माणूस नाही काय? अहो, माझा जन्म महाराष्ट्रातच झाला. इथल्याच मातीत मी अनेक प्रयोग केले आणि मला तुम्ही परका मानता?... मराठी माणसाठी तुमची व्याख्या काय?... मी काय मराठी माणूस नाही का?

***तसं नाही - पण मारवाडी, गुजराती माणसं व्यवसायात यशस्वी ठरतात आणि महाराष्ट्रीयन माणूस अपयशी ठरतो अशी परिस्थिती नाही का?***

याचं कारण वेगळं आहे. पण मराठी माणूस व्यवसायात अपयशी ठरतो असं मला तरी वाटत नाही. हो, एक मात्र आहे - आपलं गाव, राज्य सोडून जे लोक दुसरीकडे जातात त्यांच्यात नैसर्गिकरीत्या कष्ट करण्याची प्रवृत्ती अधिक असते. तुम्ही कुठलाही मारवाडी माणूस पहा, तो तुम्हाला अहोरात्र कष्ट करताना दिसतो. शिवाय तो इथल्या समाजजीवनाशी इतका एकरूप झालाय की त्याच्याशिवाय समाज म्हणजे मिठाविना भोजन... आता तुम्ही म्हणाल की मारवाडी माणूस नोकरीमध्ये कधीच जात नाही, असं का? तर याला काही कारणं आहेत, ब्राह्मण समाजाने इतिहासकालापासून आपली जडणघडण नोकरीच्या अनुषंगाने केली आहे. नोकरीत सुरक्षितता अधिक असते, पण या समाजातील मोठं यश म्हणजे काय तर क्लार्कऐवजी आय.ए.एस. होऊ, म्हणजे नोकरीच! पण उच्च दर्जाची ब्राह्मण कुटुंबं आपल्या मुलांना लहानपणापासून नोकरीच्या दृष्टीनेच घडवतात. तर मराठा समाज शेतीव्यवसायात मोठ्या प्रमाणात पडल्यामुळे शेती, त्याला अनुषंगून व्यवसाय किंवा राजकारण, सहकारी संस्था हा त्यांचा स्थायीभाव झाला आहे. इतर समाज आता या वातावरणातून बाहेर पडत आहे. उदाहरणार्थ बुरूड समाज. तो त्याच्याशी संबंधितच उद्योग करतो. याच्यातून बाहेर पडून ज्यांनी ज्यांनी परंपरागत चौकटी मोडण्याचा प्रयत्न केला ती माणसं यशस्वी ठरलेलीच आहेत, शंतनुराव किर्लोस्कर, आबासाहेब गरवारे ही त्याची उदाहरणे आहेत. पण या तुलनेने मराठी माणसं बाहेर जाण्याचं प्रमाण कमी आहे. ही व अशी अनेक कारणं आहेत, माणसाची जडणघडण व्यापारी म्हणून होत नाही. याउलट मारवाडी माणूस शिकला तरी व्यवसायात उपयोग होईल म्हणून आपल्या मुलांना सदैव तेच धडे देत असतो.



**मी एक व्यापारी आहे. पैसे कमावणं हा माझा व्यवसाय आहे. माझ्या व्यवसायाची उलाढाल कितीही मोठी असली तरी मी काही अवकाशमानव नाही. मीही माणूसच आहे. माझ्यातही काही दोष असतील, पण डोळे उघडे ठेवून नव्याचा सतत अभ्यास करून या मातीशी इमान असणारा व्यवसाय कष्टाने केला म्हणून मला आजचा दिवस पाहता आला आणि भवितव्यातही माझ्या मुलांना कष्टच करावे लागतील. अन्यथा हा व्यवसाय टिकणार नाही, असा हा व्यवसाय आहे.**




आधुनिकता आणि परंपरा यांचा संगम


***या परिस्थितीत बदल होण्यासाठी काय करावं?***

या देशातून इंग्रज गेले तरी त्यांनी आखलेली शिक्षणपद्धती तशीच चालू आहे. सध्याची विद्यापीठं म्हणजे नुसतेच पदव्यांचे कारखाने झाले आहेत. त्यामुळेच प्रत्यक्ष कृतीवर आधारित भविष्याशी निगडित शिक्षण देणारीच शिक्षण पद्धती हवी. यात विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगाने विकास व्हायला हवा. त्यांचं निरीक्षण अत्यंत सूक्ष्म असायला हवं व प्रयोगशीलतेला महत्त्व हवं.

***कृषीक्षेत्रात युवक-युवतींना आगामी काळात काय भवितव्य आहे?***

आता पहा, भारत हा कृषिप्रधान देश आहे. सत्तर टक्के लोक शेतीशी संबंधित व्यवसाय करतात. इतर देशांची परिस्थिती वेगळी आहे. आपल्याकडे हवा, भरपूर सूर्यप्रकाश, मुबलक पाणी अशा प्रचंड सुविधा निसर्गाने निर्माण करून दिल्या आहेत आणि या व्यवसायाइतक्या संधी कुठल्याही क्षेत्रात नाहीत; पण माफ करा, कृषी व्यवसायात लगेच पैसा मिळेल अथवा कमी कष्टात पैसा मिळेल असं वाटणाऱ्यांनी येऊ नये. शासनानेही बेरोजगार तरुणांसाठी अनेक कृषिविषयक योजना आखल्या पाहिजेत. उद्योगपतींच्या मदतीने पडिक जमिनींवर शेतीशी संबंधित व्यवसायाला भरपूर सवलती दिल्या पाहिजेत. बेकारी दूर व्हायला मदत होईल. दुर्दैवाने सध्याचे तरुण केवळ भौतिक गोष्टींचाच विचार करतात.

***गॅट करारामुळे तरुणांच्या व्यवसाय-नोकरीच्या निवडीवर काय परिणाम होईल?***



**तारुण्यातले कष्टाळू सौंदर्य**

गॅट कराराबद्दल कुणी काहीही म्हणो अथवा आंदोलनं करो, पण कष्ट करणाऱ्या विशेषतः भारतीयांना गॅट करार ही एक संधी आहे. पण परदेशी बाजारपेठा काबीज करून आपण इतरांवर मात केली व विविध व्यवसाय जगभर पोचवले आणि ती महत्त्वाकांक्षा असेल तरच! अन्यथा बाबुगिरी (नोकरी) करत जगणाऱ्यांसाठी मात्र ती एक मोठी समस्या आहे.

***व्यवसायात यशस्वी होण्यासाठी कोणत्या गोष्टी टाळाव्या?***

मुख्य म्हणजे मी कोणत्याही व्यसनात गुरफटलो नाही. मला कोणत्याच प्रकारचं व्यसन नाही. मर्यादेचं कधी उल्लंघन केलं नाही - नेहमी दीर्घ, गंभीर विचार केला, कोणत्याही निर्णयामध्ये घाई केली नाही. झटपट पैसा मिळविण्याच्या नादी लागलो नाही. परिश्रमाची कास सोडली नाही,



**आपण प्रामाणिकपणे मोठे होऊ शकत नाही ही भावना युवकांच्या मनात रुजायलाही सध्याची सामाजिक व्यवस्थाच कारणीभूत आहे. कायद्याच्या कचाट्यात सापडलो की आपलं काही खरं नाही ही भावना रुजल्यामुळेच तरुण उद्योगधंद्याकडे वळण्याऐवजी नोकरी करून साचेबंद जीवन जगण्याचं मान्य करतात. ही परिस्थिती बदलायला हवी.**

***तुमच्या घरातील युवकांना सुख-सुविधा मिळाल्याने त्यांच्या कर्तृत्वाला अडथळा आला अथवा त्यांची कार्यक्षमता कमी झाली असं वाटतं का?***


बिलकुल नाही! कारण घरात स्थावर इस्टेट नाही, त्यामुळे निवांतपणे बसता येणं अशक्य - उलट या वयातदेखील मी काम करतो हे पाहून माझ्या कामाचा भार हलका करण्यासाठी आमच्या तरुण पिढीने जास्त कष्ट, परिश्रम केले तरच माझं काम कमी होऊ शकतं - म्हणजे हा उद्योग उभा राहण्यासाठी जेवढे परिश्रम लागले त्यापेक्षा कितीतरी पटींनी अधिक परिश्रमाची हा उद्योग चालू ठेवण्यासाठी गरज आहे. हे सर्व युवा पिढीला करायचं आहे, त्यामुळे त्यांच्या कर्तबगारीत शिथिलता येईल असं वाटत नाही.

***व्यवसायातील स्पर्धकांवर कशी मात केली?***

स्पर्धकांवर मात करण्याचा किंवा त्यांना संपवण्याचा विचार कधीच मनाला शिवला नाही. उलट त्यांच्याकडून खूप काही शिकता आलं आणि आम्ही सतत वेगवेगळे प्रयोग करीत असल्याने आम्ही आमच्या व्यवसायात प्रथम क्रमांकावरच आहोत.

***तुमच्या जाहिरातींमधील कल्पकता किंवा आवाहनं समाजमनाला भिडतात. हे सारं कोण करतं?***

यामधील कल्पना आमच्या असतात आणि मांडणी 'बीज'च्या (एक जाहिरात संस्था) आनंद गुप्ते यांची असते. आता एक उदाहरण सांगतो. 'खानदेशातील युवकांनो परत खानदेशात या' असं एक आवाहन आम्ही प्रसिद्ध केलं होतं. इंडियन एक्स्प्रेस या इंग्रजी वृत्तपत्रानेही एक अपवाद म्हणून ही मराठी जाहिरात पहिल्या पानावर देशभर प्रसिद्ध केली होती. त्यामागचं कारण होतं की, जैन उद्योगसमूहामुळे जगाच्या औद्योगिक नकाशावर जळगावचं नाव दिमाखाने झळकत आहे; पण लेखक, कवी, गायक, क्रीडापटू, उत्तम डॉक्टर, इंजिनिअर किंवा आपापल्या क्षेत्रात कर्तबगारी गाजविणाऱ्या पण पूर्वी संधी नाही म्हणून खानदेश सोडलेल्या कुठल्याही क्षेत्रातील लोकांमुळे जळगावला प्रत्येक क्षेत्रात देशात सन्मानाचं स्थान मिळावं म्हणजे अशा लोकांचा सहवास आम्हालाही काही आनंदाचे क्षण देऊ शकेल आणि नवं काही शिकवू शकेल हा जाहिराती मागचा हेतू होता. त्याचा परिणाम झालाच. ही कल्पना मला माझ्या मनावर



कर्तबगारीची सहपिढी



**सर्व क्षेत्रातील कर्तबगार व्यक्ती मित्र व्हाव्यात आणि त्यांनी जळगावला जगाच्या नकाशावर सन्मानाचं स्थान द्यावं असं मला सतत वाटतं. राजकीय क्षेत्रातील सुरेशदादा जैनपासून कविवर्य ना. धों. महानोर, आनंद गुप्ते, राजा मयूर, डॉ. सुभाष चौधरी, सी. पी. मेहता, संजीव शेळगीकर, सुबीर बोस या मित्रांमुळे मला विविध क्षेत्रं न्याहाळता येतात. पुस्तकांना तर माझ्या जीवनात सर्वांत प्रभावी स्थान आहे. त्यामुळे मला आनंद आणि समाधान मिळतं.**



**व्यसन मग ते कोठल्याही प्रकारचं असो जगण्याचा आनंद नष्ट करतं. यशाची महत्त्वाकांक्षा असावी पण व्यसन नको. कुठलीही अतिरेकी गोष्ट मी टाळली. दारूच काय, चहा, कॉफीसुद्धा मी घेत नाही. म्हणूनच ही यशाची वाटचाल सामर्थ्याने पार करू शकलो. त्याचबरोर आपण हायफाय संस्कृतीशी जुळवून घेतलं तरच सन्मान मिळतो ही भावना युवकांनी मनातून काढून टाकायला हवी. नवीन क्षेत्रं काबीज केलीच पाहिजेत, पण त्यासाठी वाईट तडजोडींची गरज नाही हे मी अनुभवाने सांगतो.**

अखंडपणे परिणाम करणाऱ्या 'ने मजसी ने परत मातृभूमीला, सागरा प्राण तळमळला' या कवितेतून आली. या साऱ्या कल्पनांमागे पैसा तर कमवायचाच... पण तो कमवताना सभोवतालच्या समाजाचं आपल्यावरील ऋणसुद्धा फेडायचं ही भावना असल्याने आमच्या जाहिराती अधिक कल्पक होतात.

***पण मध्यंतरीच्या 'वासनाकाण्ड' प्रकारामुळे सर्व क्षेत्रांतील जळगावच्या प्रतिष्ठेवर काही परिणाम झाला असं वाटतं का?***

तो आम्ही कष्टाने उभ्या केलेल्या जळगावच्या प्रतिमेला खराब करण्याचा कुटिल व राजकीय डाव होता; पण हा डाव यशस्वी होणार नाही आणि जळगावच्या प्रतिमेला बसलेला तात्कालिक तडा दूर होऊन पूर्वीपेक्षा अधिक तेजाने जळगाव पुन्हा दिमाखाने तळपत राहील.

***एखाद्या गोष्टीची भीती तुम्हाला वाटते का? किंवा आयुष्यात अमुक एक गोष्ट घडू नये असं वाटतं का?***

आज भारतीय संस्कृती झपाट्याने बदलते आहे, पाश्चात्यांचं अंधानुकरण वाढत आहे, जीवनातील नीतिमूल्यांचा ऱ्हास होतो आहे, हे पाहिल्यावर मला वाटतं की जगाच्या बरोबर धावण्यासाठी तुम्हाला बदल करायलाच हवा, परंतु तो आमूलाग्र बदल करू नका, पाश्चात्य संस्कृतीच्या आहारी जाऊ नका. कोणत्याही गोष्टींचा अतिरेक करू नका. या अतिरेकापायी भारतीय संस्कृती लयाला जाईल अशी भीती वाटते. ती गोष्ट घडू नये.

***उद्योगपती झाला नसतात तर दुसरं कोणतं क्षेत्र आपण निवडलं असतं?***

मला वकील किंवा लेखक व्हायला आवडलं असतं.

***युवकांसाठी काही सांगाल?***

जीवनात काही न बदलता येणाऱ्या गोष्टी असतात. म्हणजे आपण आपले आई-वडील बदलू शकत नाही. आपण केवळ बदलू शकतो तो जगाकडे पाहण्याचा दृष्टिकोन. हा दृष्टिकोन साफ ठेवा.

चांगल्या-वाईट यामधील फरक जाणण्याची ईश्वराने बुद्धी दिली आहे, तिचा वापर करा. सन्मार्गाने मोठं होण्यासाठी कठोर परिश्रम, प्रयत्न केल्यास यशाचं शिखर गाठणं अशक्य नाही. जीवनातील मानसिक शांतता नष्ट होईल असं कोणतंही कृत्य घडणार नाही याची दक्षता घ्या!

# जैन उद्योगसमूहाचे उद्योग

जैन फाउंडेशनने व्यवसाय हा सामाजिक जाणिवेतूनच केला आहे. जैन ग्रुपने शिक्षण, आरोग्य, संस्कृती व पर्यावरण हे समाजाचे मुख्य चार स्तंभ आहेत हे जाणलं होतं. त्यांनी समाजाचा दुर्लक्षिलेला, खेड्यापाड्यांतील समाजाच्या उन्नतीसाठी 'जैन फौंडेशन' ही संस्था १९८२ साली सुरू केली.

अर्थातच या संस्थेतर्फे खेड्यातील लोकांना खेळ, पर्यावरण, आरोग्य, संस्कृती इत्यादींबद्दल चांगली माहिती देऊन त्यांच्या क्षेत्रात त्यांची उन्नती करण्यासाठी प्रोत्साहन देऊन विविध सोयीसुविधा निर्माण करून दिल्या.

खेळ व आरोग्य यासाठी त्यांनी अद्ययावत साधन-सामग्री असलेला जिमखाना सुरू केला. तसेच त्यासंबंधात योग्य शिक्षण देणारे कोच ठेवले व त्या संदर्भातील इतर कोर्सही चालू केले. त्यांना प्रोत्साहित करण्यासाठी अधूनमधून सतत विविध स्पर्धा आयोजित करण्यात येतात. यात खो-खो,

*भवरलाल जैन यांची मुलाखत घ्यायला आम्ही त्यांच्या कारखान्यात गेलो तेव्हा कारखान्याच्या भिंतीवर ऑईल पेंटने कामगारांसाठी एक वाक्य लिहिलेलं दिसलं, 'आपण प्रथम क्रमांकावर आहोत आणि आपल्याला तो टिकवायचा आहे.' या वाक्यातून जैन उद्योग समूहाची ईर्ष्या कळून येते.*

व्हॉलिबॉल, टेबल टेनिस, बॅडमिंटन, स्वीमिंग, क्रिकेट, ट्रेकिंग इ. विविध आंतरराष्ट्रीय स्पर्धा घेण्यात येतात.

तसेच संस्था खेळाडूंना दत्तक घेऊन त्यांना सर्व सोयीसुविधा, कोच देऊन कुशल खेळाडू घडविण्याचा प्रयत्न करते.

जगातील पहिल्या १० ठिबक सिंचन संस्थांमध्ये जैन इरिगेशन कंपनीचा नंबर लागतो.

जैन इरिगेशन ही प्लास्टिक शीट्स बनविणारी आशिया खंडातील सर्वात मोठी कंपनी आहे.

ज्ञान संवर्धनासाठी वेळोवेळी परिसंवाद, प्रशिक्षण वर्ग, सेमिनार इत्यादी घेण्यात येतात.

जैन उद्योगसमूहाच्या विविध उत्पादनांना युरोप, नेपाळ, आबुधाबी इत्यादी अनेक ठिकाणी मागणी आहे.

पपईच्या चिकापासून पावडर तयार करणं हाही जैन समूहाचा एक उद्योग आहे. हा उद्योग जगात सध्या दुसऱ्या क्रमांकाचा आहे. या पावडरला पपेने म्हणतात. या विभागाला आय. एस. ओ. ९००१ हे सर्टिफिकेट मिळालं आहे.

जैन समूहातील कामगारांना कामाच्या वेळात चहा दिला जात नाही, तर दूध आणि केळी पुरविली जातात. मुळात जैन कुटुंबातील एक-दोन व्यक्ती सोडता कोणीही चहा पीत नाही.



**या** देशात शिक्षण घेऊन डॉक्टर, इंजिनिअर होऊन परदेशात जाणाऱ्यांचा मला अत्यंत राग आहे. ५०० शेतकऱ्यांच्या मुलांचे शिक्षणाचे पैसे शासन एका डॉक्टरवर खर्च करते आणि हेच डॉक्टर मात्र केवळ पैशासाठी परदेशात जातात. ते देशद्रोही आहेत असं माझं स्पष्ट मत आहे. देश सोडताना 'ने मजसी ने परत मातृभूमीला, सागरा प्राण तळमळला' म्हणणारे सावरकर कुठं आणि गरिबांच्या पैशावर डॉक्टर होऊन देश सोडणारे कुठं? म्हणून माझ्या मनावरील सावरकरांच्या या ओळींचा परिणाम मला सतत या मातीत काहीतरी नवीन करून देशसेवा करायची प्रेरणा देतात.

# स्वतःविषयी : भवरलाल जैन

***जन्मस्थळ व जन्मदिनांक*** *: अजिंठ्याच्या पायथ्याशी ४०० लोकवस्ती असलेलं खेडे वाकोद. १२ डिसेंबर १९३७.*

***वाढदिवस कसा साजरा करता?*** *कधीच साजरा केला नाही. कधी तसा विचारही केला नाही.*

***आई-वडील काय करत होते?*** *आई अशिक्षित, घरकाम करत असे, वडील कॉटन जिनिंग प्रेसिंग फॅक्टरीचे एजंट होते, नंतर शेती.*

***उद्योजक झाला नसता तर काय होणं आवडलं असतं?***

*लेखक.*

***उद्योजकतेकडे कसे वळलात?*** *सुरेशदादांचे वडील आणि आईने दिलेल्या सल्ल्यामुळे.*

***व्यवसायातील आदर्श?*** *माझे मित्र व मार्गदर्शक असलेले जैन इरिगेशनचे संचालक श्री. हांडासाहेब, शेख चाचा.*

***जिवलग मित्र*** *- ना. धों. महानोर, सुरेशदादा जैन, राजाभाई मयूर, डॉ. सुभाष चौधरी, सी. पी. मेहता, सुबीर बोस, भाईसाहेब मल्हारा, गिनी फराद, आनंद गुप्ते, संजीव शेळगीकर.*

***मैत्रीण*** *-या कल्पनेच्या फंदात पडलो नाही.*

***यशाचे रहस्य*** *- यश सविनय पचविण्याची क्षमता.*

***आवडते नेते*** *- जवाहरलाल नेहरू, वेगळ्या पातळीवर महात्मा गांधी, अब्राहम लिंकन, जॉन एफ. कॅनेडी.*

***आवडते लेखक*** *- वि. स. खांडेकर, ना. सी. फडके, साने गुरुजी, जवाहरलाल नेहरू.*

***सध्याचे वाचन*** *- बहुतांश व्यवस्थापन क्षेत्रातील.*

***आवडलेला चित्रपट*** *- 'आवारा'. गेल्या पंचवीस वर्षापासून चित्रपट पाहिलेला नाही.*

***कलेदलचा दृष्टिकोन*** *- कोणतीही चांगली कला येणाऱ्या माणसाला शक्य ती मदत करतो. ना. सी. फडके व वि. स. खांडेकर यांच्यातील कलेसाठी कला की जीवनासाठी कला या वादात मी खूप गुरफटून गेलो होतो.*

***नाटक पाहता?*** *अतिशय आवडीने पाहतो. लहानपणी जळगाव आठवडी बाजारात दहा हजार लोकांसमोर 'पश्चाताप' या नाटकात 'लक्ष्मीबाईची' स्त्रीभूमिका केली होती. पहिलं बक्षीस मिळालं होतं. आवाज सोडला तर हा मुलगा आहे असं कोणालाच वाटलं नाही.*

***बालपण कसं गेलं?*** *सर्वसाधारण परिस्थितीत. आई-वडिलांचा डोळा चुकवून नदीवर डोहावर खूप पोहलो. शेतीकामही केलं.*

***शाळेतील हुशारी*** *- अभ्यासात फार हुशार नव्हतो.*

***शिक्षणाविषयी दृष्टिकोन*** *- सध्याचं शिक्षण निराशाजनक आहे. जीवन आणि शिक्षणातील अंतर वाढत आहे आणि यातूनच अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. होत आहेत.*

***देव मानता?*** *देव मानतो असं नाही, पण जीवनाचा रहाटगाडा व्यवस्थितपणे कुणीतरी दैवी*

शक्ती चालवते असं वाटतं.

**पुनर्जन्मावर विश्वास आहे का?** हो. पूर्वजन्माचं संचित असल्याशिवाय ज्ञानेश्वर कमी वयात ज्ञानेश्वरी लिहू शकणार नाहीत असं वाटून जातं.

**आवडते रंग** - मी ज्यात जन्मलो, रंगलो ते आकाश, पाणी आणि मातीचे रंग.

**आवडता पोशाख** - पांढरा सदरा किंवा सफारी.

**पोशाखावरील वयाचा परिणाम** - वयस्कर होत आहोत हे विसरण्यासाठी कलरफूल पोशाख घालायला हरकत असू नये अशा विचारापर्यंत मी पोहोचलो आहे.

**खाद्यपदार्थ** - गोड पदार्थ अजिबात आवडत नाहीत. हृदयविकाराचा झटका आल्यापासून आवडीच्या तळलेल्या पदार्थांचं पथ्य पाळावं लागतं.

**आवडते खेळ** - खेड्यात असताना हुतूतू, नंतर शहरात बॅडमिंटन, पोहणं आणि चालणं.

**आनंदाचा क्षण** - कधीच बेभान होऊन नाचलो नाही. कधीच ओक्साबोक्शी रडलो नाही. अतिदुःख, अतिनिराशा स्वभावात वसत नाही. आनंदासाठीही मी संतुलनाचा बळी दिला नाही. वडील, चुलते गेले तेव्हा वाईट वाटलं. पण पुन्हा सावरलो.

**उद्योग कसा चालवता?** माझ्या पद्धतीनेच जग चालावं असा माझा अट्टाहास नाही. इतरांचा दृष्टिकोन अभ्यासून स्वतःत सुधारणा होऊ शकतात यावर माझा विश्वास आहे.

**सौंदर्यविषयक कल्पना** - माणूस निव्वळ भाकरीवर जगतो हे अर्धसत्य आहे. जैन फाऊंडेशनने जळगावच्या सौंदर्यीकरणात सक्रिय भाग घेतला आहे.

**अध्यात्मिक दृष्टिकोन** - अंतिम आत्मसुखासाठी चिंतन, ध्यान-धारणेला पर्याय नाही. जैन उद्योगसमूहात वरिष्ठ अधिकाऱ्यांना डॉ. गुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली ध्यानधारणेचं शिक्षण देण्यात येतं.

**पत्नीबद्दल काय वाटतं?** प्रत्येक यशस्वी पुरुषामागे स्त्री असते हे मला माझ्या बाबतीत अनुभवायला मिळालं आहे. तुकाराम, नामदेव अपवाद असतील. माझी पत्नी सौ. कांताबाईने आयुष्यात कधीही डोळ्यांत पाणी किंवा राग आणून काही ऐकवलं नाही. तिला घर चालवण्यात व मला व्यवसाय करण्यात पूर्ण स्वातंत्र्य होतं. आम्ही एकमेकांच्या कामात कधीच हस्तक्षेप केला नाही. पत्नी शिकलेली आणि समजूतदार आहे. त्यामुळे काही 'ऐकण्याचा' प्रसंग उद्भवला नाही. बहुतेक वेळा शांतता, अबोलता हेच संभाषण असतं.

**सौ. कांताबाई जीवनात आल्या नसत्या तर यश गाठू शकला असता?** असा कधी विचार केला नाही.

**मुलांवर ठरवून प्रेम केलंत?** कधीच नाही. प्रेम व्यक्त करण्याची गरज भासावी एवढं माझं प्रेम कामचलाऊ नव्हतं. प्रेम व्यक्त करण्याच्या 'जगातील' कल्पना वरकरणी कृत्रिम वाटतात.

**मुलांवर संस्कार केले?** ठरवून, जाणीवपूर्वक असे केले नाहीत. फक्त पारदर्शकपणे त्यांच्यासमोर जगत राहिलो.

**मुलांना किती वेळ दिलात?** जास्त वेळ देता आला नाही, पण जो दिला तो दर्जेदार पद्धतीने दिला. मी चांगला असेन तर त्यांच्या मनावरील माझं प्रतिबिंबही चांगलंच असेल. एक कृती करून दुसरी दाखवत डबल जीवन जगणाऱ्या तथाकथित मोठ्या लोकांची मुलं वाह्यात निघतात. वाऱ्यावर वाहून जातात. मुलांच्या संस्कारक्षम वयात त्यांच्यासमोर चांगलं घडत राहिलं.

**मुलांनी काय व्हावं असं वाटत होतं?** त्यांच्यावर कधीच दबाव टाकला नाही. मी, माझा व्यवसाय आदर्श वाटला म्हणून अशोक, अनिल, अजित आणि अतुल शिक्षण घेतल्यानंतर याच व्यवसायात आले आहेत.

**जीवनविषयक तत्त्वज्ञान** परिश्रम हेच आत्मिक समाधानाचं अधिष्ठान आहे.



**आपलं काम प्रामाणिकपणे केलं आणि डोळे उघडे ठेवले तर प्रचंड मोठं होता येतं हे सांगणाऱ्या शिक्षण पद्धतीची आता देशाला गरज आहे. आजची शिक्षणपद्धती ही केवळ बाबूगिरी करणारी पिढी निर्माण करीत आहे. सुदैवाने आपल्या देशात विविध क्षेत्रांत त्यातही कृषी क्षेत्रात प्रचंड वाव आहे, पण हे काम मनाचा दगड करणाऱ्यांसाठीच शक्य आहे. कारण कठोर परिश्रमानंतरच फळे मिळतात. झाड लावताच फळं येत नाही. तेवढं थांबायची तयारी असणाऱ्या युवकांना मात्र यात भरपूर**

# जीवन म्हणजे रंगमंच नव्हे

**विवाह ही प्रत्येक माणसाच्या आयुष्यातली महत्त्वाची घटना. भवरलाल जैन यांच्याशी बोलता बोलता विषय त्यांच्या विवाहाकडे वळला, तेव्हा त्यांनी किस्सा सांगितला —**

*ब*ऱ्याचदा आपल्या आयुष्यात निवडलेला साथीदार हा आपल्या भविष्यावर परिणाम करीत असतो. विवाह ही जीवनातील अत्यंत महत्त्वाची घटना असते. त्या काळच्या माझ्या आठवणी आजही ताज्या आहेत. आता एकदा विवाह करायचं निश्चित झाल्यावर मग वधुसंशोधन सुरू झालं. त्यानुसार नाशिकमधील एका नामांकित वकिलाची मुलगी मी आणि माझा मित्र दोघं मिळून पाहायला गेलो. मुलगी सुंदर, सुसंस्कृत, शिकलेली होती. त्यांची आर्थिक परिस्थिती बेताची असली तरी मला मुलगी आयुष्यभर बरोबर राहणारी हवी असल्याने त्यांच्याशी काही घेणं नव्हतं. त्यामुळे ते स्थळ पाहून लग्न ठरवावं असा विचार करून आम्ही गेलो व तिला काही प्रश्न विचारलं, पण मुलगी इतकी हुशार होती की तिने माझ्या प्रत्येक प्रश्नाचं उत्तर नवीन प्रश्नानेच दिलं. हा सगळा प्रकार संपल्यावर बाहेर आल्यानंतर माझा मित्र म्हणाला, 'भवरलाल, आपलं जीवन म्हणजे रंगमंच नाही आणि जी मुलगी आताच तुला इतके प्रश्न विचारते तिचं पुढं कसं काय? बायको संयमी हवी. अन्यथा तुझं आयुष्य म्हणजे रंगमंच होईल. प्रश्नोत्तराचं नाटक होईल.' मग विचारांती मी तो विषय सोडून दिला. नंतरची मुलगी (म्हणजे वर्तमान पत्नी) पाहायला आम्ही कर्नाटकातील विजापूरमध्ये गेलो. मुलगी चांगली, शिक्षणही बी.ए. एकंदर पार्श्वभूमी पाहता मुलगी मला आवडली, पण नंतर प्रश्न होता हुंड्याचा. आमच्या व्यापारी समाजात हुंड्याला तसं भरपूर महत्त्व. त्यामुळे आईलाही त्यांच्याकडून हुंडा मिळावा अशी अपेक्षा होती. त्या वेळचा प्रसंग आजही माझ्या डोळ्यांसमोर जसाच्या तसा आहे. त्यावेळी आमचं गावात जुनं घर होतं. मातीच्या त्या घरामध्ये चौक असायचे तसे आमच्याही घरात होते. त्या चौकात माझी आई भांडी घासत होती, त्या वेळी मी समोर जिनावजा ओट्यावर येऊन काय करायचं हे बोलू लागलो. आई म्हणाली, 'भवर, तू दिसायला इतका चांगला आहेस. शिवाय तुझ्यावर, तुझ्या शिक्षणावर काही खर्चही झाला आहे, तेव्हा हुंडा घ्यायला काय हरकत आहे?'

त्या वेळच्या प्रथा तशा असल्याने सर्वत्र तसा प्रघातच होता. पण मी आईला समजावून सांगितलं, 'बाई, मुलगीही शिकलेली आहे, सुंदर आहे, सुसंस्कृत आहे. तिच्यावरही तिच्या कुटुंबियांनी भरपूर खर्च केला आहे आणि अशी व्यक्ती आपल्या घरात आल्यावर आपलीच होणार. म्हणजे उलट आपण त्यांना हुंडा द्यायला हवा.' त्या धीरगंभीर वातावरणात आईने भांडी घासता घासता मान वर करून क्षणभर माझ्याकडे पाहिलं. तिची ती विचारी नजर मला अजून आठवते. थोड्या चर्चेनंतर तिला माझा मुद्दा मात्र पटला. आईने हुंडा न घ्यायला होकार दिला आणि लग्न बिनहुंड्याचं झालं.

नंतरच्याही काही आठवणींनी आज हसू येतं. बायको पदवीधर आहे की नाही हे सहज गंमत म्हणून पडताळण्यासाठी तब्बल १२ वर्षांनी मी एस. एन. डी. टी. कॉलेजकडून पदवीचं प्रमाणपत्र मागितलं आणि ती पदवीधर आहे याची तेव्हा खात्री झाली.

माझी पत्नी संयम, निष्ठा, प्रेम यांचं मूर्तिमंत प्रतिक असल्याने माझं जीवन रंगमंच न होता मंदिर झालं आहे.

कॉक



**मी ठरवून मोठे उद्योग केलेले नाहीत. मी बहुतांशी वर्तमान काळातच जगलो. कारण भूतकाळात डोकावलं तर मागच्या आठवणींनी मन कटू बनतं, तर भविष्याची काळजी केली तर उगाचच आयुष्यभर काळजीतच जगावं लागतं व उद्याच्या चिंतेत आज वाया जातो. भविष्याचा मी विचार केला तरी सतत वास्तववादी वर्तमानात जगलो.**